वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडच्या सुज्ञान मतदारांनो, तुमचा योग्य निर्णय घेण्यासाठी आता तुमच्याकडे आहेत फक्त ३६ तास

## या ३६ तासात गांभीर्यपुर्वक विचार करा, योग्य निर्णय घ्या

मंगळवारी सकाळ सकाळी उठून नमाज अदा करून देवाचे दर्शन घेवून बाबासाहेबांचे आशिर्वाद घेवून घरातून बाहेर निघा आणि ३५ वर्षे या शहराचे वाटोळे करणाऱ्यांचे चांगलेच वाटोळे करा....



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

शहरात चांगले आणि उच्च दर्जाचे सिमेंट रस्ते हवे म्हणुन शासनाने करोडो रूपयांचा निधी या सत्ताधाऱ्यांना दिला पण या सत्ताधाऱ्यांनी त्यामध्ये भ्रष्टाचार करून मोठ मोठ्या महागड्या चारचाकी वाहने खरेदी करून स्वत:च्या कमरेच्या मानेचे मनके निट्नाटके ठेवले पण त्या गोर गरीबांना या आजाराची लागन लावणाऱ्यांना आपण मतदान करणार का?

## स्वच्छतेतील घाण कचऱ्याचे, गटारीचे पैसे खाणाऱ्यांना आपण निवडून देणार का?

### योग्य उमेदवाराचं बटन दाबा, भरघोस मतांनी विजयी करून शहराचा विकास करणाऱ्यांना विजयी करा

**बीडकरांनो, ते दिवस लक्षात ठेवा तुम्ही पिण्याच्या पाण्यासाठी एक एक महिना त्रस्त होतात आणि हे भ्रष्टाचारी पुढारी मिनरल वॉटरचे (बिस्लरी) पाणी पिवून फिरत होते आणि तुम्ही आम्ही डोक्यावर हांडे घेवून पाणी बघत भटकत होतोत**

बीडकरांनो, लक्षात ठेवा १२७ कोटी रूपयांच्या अमृत जल योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्यांना आपण पुन्हा निवडून देणार का?

बीडकरांनो लक्षात ठेवा ११२ कोटी रूपयांची भुयारी गटार योजनेत भ्रष्टाचार करून योजना बंद पाडणाऱ्यांना आपण मतदान करणार का?

बीडची नगर पालिका ही स्वत:ची प्रायव्हेट मालमत्ता आहे हे समजून राज करणाऱ्यांना आपण पुन्हा संधी देणार का?

# इलियास टेलर यांनी यापुर्वी केलेली विकास कामे येत आहेत आता कामी

## मोठा-दांडगा जनसंपर्क, मित्र परिवार आणि प्रत्येकाशी असलेले मैत्रीपुर्ण संबंधामुळे विजय निश्चित





बीड, (दिव्य न्युज):- शहरातील प्रभाग क्रं. १७ मधून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले बीड नगर पालिकेचे माजी सभापती तथा काँग्रेसचे जेष्ठ नेते इलियास टेलर यांची कन्या ही निवडणुकीच्या मैदानात असुन इलियास टेलर यांनी यापुर्वी नगरसेवक असतांना या प्रभागात केलेली दर्जेदार विकास कामे आज त्यांच्या मुलीच्या कामे येत आहेत. नगरसेवक असतांना इलियास टेलर यांनी या प्रभागासाठी महत्वपुर्ण काम केले म्हणजे ते पिण्याच्या पाण्याचे प्रभागात तब्बल ६ पेक्षा जास्त बोअर घेवून त्यामध्ये सर्मशिबल पंप बसवून संपूर्ण प्रभागाला २४ तासा पाणी मिळेल याचे नियोजन केले होते. तोच पाणी पुरवठा आजही प्रभागात सुरळीत सुरू आहे. शहरात इतर भागात पाण्याची

▶▶ पान २ वर

# प्रभाग क्रं.६ मध्ये जकी सौदागरांना नगरसेवक पदाची लॉटरी लागणार

## प्रभागात घड्याळचे काटे घर घर फिरू लागले, मतदारांनीच हाती घेतली निवडणूक



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेतील प्रभाग क्रं. ६मधून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अधिकृत उमेदवार असलेले जकी सौदागर यांच्या पत्नी आणि जयतुल्ला खान हे आहेत. मागील पंधरा वर्षापासून जकी सौदागर हे सामाजिक कार्यात पुढे आहेत. समाजकार्य करतांना त्यांनी कधीही मागे पुढे पाहिले नाही. गोरगरीबांना नेहमीच ते मदत करतात, मागील झालेल्या कोविडच्या काळात त्यांनी प्रत्येकांना भरपुर मदत केली. त्याची आठवण आज लोक काढत आहेत. प्रभागच नव्हे तर शहरातील इतर भागात त्यांनी या संकटाच्या काळात मदत पोहचविली. या प्रभागात जकी सौदागर यांना

▶▶ पान २ वर

# प्रभाग क्रमांक १७ (ब) मध्ये शेख शफिक यांची 'हॅट्रिक'च्या दिशेने मजबूत वाटचाल





बीड, (दिव्य न्युज):- प्रभाग क्रमांक १७ (ब) मध्ये आगामी निवडणुकीची तापमान वाढू लागली असून या प्रभागात शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार रुकसाना बेगम शेख शफिक यांची लोकप्रियता पुन्हा एकदा चांगलीच झळकत आहे. सलग दोन वेळा प्रभागावर वर्चस्व मिळवलेल्या रुकसाना बेगम शेख शफिक यांनी यंदाही जोरदार तयारी सुरू केली असून नागरिकांच्या अपेक्षा व पाठिंब्यामुळे त्यांच्या 'हॅट्रिक'ची शक्यता आणखी अधोरेखित होत आहे, रुकसाना बेगम शेख शफीक यांची निशाणी फुटबॉल आहे.

स्थानिक पातळीवर रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच विकासकामांमध्ये त्यांनी केलेले प्रयत्न मतदारांना भावत आहेत. प्रभागातील अनेक भागांत नुकत्याच झालेल्या पाहणी दौर्यात त्यांना मोठ्या संख्येने लोकांनी भेट देत आपला पाठिंबा जाहीर केला. तरुण मतदार आणि महिला वर्गाकडूनही त्यांना मिळणारा

▶▶ पान २ वर

## शेतकरी कामगार पक्ष हे न्यायसाठी लडणारा पक्ष

शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास जुना आहे या पक्षाचे अनेक नेते मंडळीने इतिहास गाजविला आहे या पक्षाचे अनेक नेते आमदार खासदार झालेले आहे राज्याच्या मंत्रालयात या पक्षाच्या नेत्यानी गोरगरीब कष्टकरी, शेतकरी, सर्व जातीय जमातीला

▶▶ पान २ वर




# देवाभाऊ उद्या बीडमध्ये

## पंकजाताईंचा कमळ फुलविण्याचा संकल्प



## विस्कटलेली घडी बसविण्यासाठी अजित पवारांचा दुसरा दौरा

### जयदत्त क्षीरसागरांनी भाजपाला दिली ताकद, आ.संदीप क्षीरसागरांचा एकाकी लढा ठरतोय यशस्वी



बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणुकीच्या प्रचाराचा उद्या सो वारी शेवटचा दिवस असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळी ११ वा.बीडमध्ये सभा घेत आहेत. मागील दोनआठवड्यापासून जिल्ह्यातील सहा नगर पालिका क्षेत्रात प्रचाराची रणधुाळी जोरात सुरू आहे. महायुतीमध्ये असलेल्या पक्षातील नेत्यांच्या आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडून गेल्या आहेत. यामध्ये परळीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा, शिंदे शिवसेना आणि रिपाइं आठवले गठ ही खऱ्या अर्थाने महायुती निवडणूक लढवित आहे. इतर ठिकाणी म्हणजे बीड, गेवराई, माजलगाव, धारूर या ठिकाणी सर्वच राजकीय पक्ष एकमेकांच्या विरोधात आहेत.

अंबाजोगाईध्ये नंदकिशोर मुंदडा आणि पापा मोदी परस्परांच्या विरोधात आघाडीकरून लढत आहेत. राज्याच्या पर्यटन मंत्री तथा भाजपा नेत्या यांनी नगर पालिका निवडणुकीपुर्वीच गेवराई, बीड, धारूर मध्ये लक्ष घातले आणि कमळ फुलविण्याचा संकल्प केला. पंकजाताईंचा संकल्प पुर्णत्वाकडे जाण्याच्या मार्गावर आहे. त्यातच कोणत्याही राजकीय पक्षाची भुमिका नसलेले जिल्ह्याचे नेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रे ापोटी बीडमध्ये आणि गेवराईध्ये भाजपाला ताकद दिली आहे. त्यांनी घेतलेल्या प्रचार सभांुळे बीडमध्ये अनेक वार्डात जुन्या नव्या कार्यक्त्यांची फौज भाजपाचे कमळ फुलविण्यासाठी जोशात कामाला लागली आहे. या सर्वा ध्ये विशेष बाब म्हणजे शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून बीडमध्ये आ.संदीप क्षीरसागर हे एकाकी लढा देत असून त्यांचा लढा यशस्वी होण्याच्या तयारीत आहे. कोणत्याही नेत्याची सभा त्यांनी घेतली नाही. यावरून त्यांचा आत्मविशास बरेच काही सांगून जातो. नगर पालिका निवडणूक लागणार हे ज्यावेळेस स्पष्ट झाले. त्याचवेळी पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्याच्या राजकारणात लक्ष घातले. गेवराई ध्ये त्यांनी माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांना एकत्र आणण्याची किमया केली. मागील दहा ते पंधरा वर्षे दोन पंडित आणि पवार यांच्यातील संघर्ष गेवराईतील जनतेने अनुभवला आहे. त्याच बरोबर बीडमध्ये ही त्यांनी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे योगेश क्षीरसागर यांना अचानक भाजपामध्ये घेवून त्यांना ताकद दिली आहे. बीड नगर पालिकेचे बहुतेक सर्व अधिकारी डॉ.योगेश क्षीरसागर यांना दिल्याने तेही आपल्या ताकदिनिशी या निवडणूकीत उतरले आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिका क्षीरसागर या जोडीने पुर्ण शहरात वार्डावार्डात जावून कमळ घराघरात पोहचविले आहे. त्यातचभाजपाची जुनी टिमही पुर्णपणे सक्रीय झाली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या जिल्ह्याचे लक्ष ज्यांच्या भुमिकेकडे होते त्या माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपली पुर्ण ताकद भाजपाच्या पाठीशी उभा केली आहे. अमरसिंह पंडित आणि आ.विजयसिंह पंडित यांनी अजित पवार राष्ट्रवादीचे सुत्रे पूर्णपणे हातात घेतल्यानंतर बीडमध्ये राजकीय दृष्ट्या स्थिरावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मात्र ते किती यशस्वी होतात, हे निवडणूकीनंतरच कळणार आहे. त्यातच रिपाइंचे पप्पू कागदे यांनी उघडपणे पंडितांच्या विरोधात भुमिका घेत त्यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची इमेज पुर्णतः डॅंज करून टाकली आहे. त्यामुळे पंडितांसमोर नवी समस्या उभी ठाकली आहे. राष्ट्रवादीची विस्कटलेली घडी पुर्णस्थापित करण्यासाठी अजित पवारांना बीडमध्ये दोन सभा घ्याव्या लागल्या. त्यांच्या सभेने किती परिणाम होतो हे देखिल मतदानातून दिसणार आहे. अंबाजोगाईत भाजपाचे नंदकिशोर मुंदडा विरूध्द अजित पवार गटाचे राजकिशोर मोदी यांनी दोघांनी पक्षीय राजकारणात न पडता आघाडी तयार करून निवडणुकीत परस्परांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. नंदकिशोर मुंदडा यांच्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे तर पापा मोदी यांच्यासाठी अस्तित्वाची आहे. धारूरमध्ये पंकजा मुंडे यांनी माधव निर्मळ यांना पक्षात घेवून तेथे भाजपाला नवीन टिम जोडली आहे. त्यामुळे धारूरमध्ये देखिल भाजपाची सत्ता टिकेल असे चित्र आहे. माजलगावमध्ये मात्र प्रकाश सोळंके, मोहन जगताप आणि भाजपा अशी तिरंगी लढत आहे. यात शरद पवार गटाचे मोहन जगताप यांनी सहालभैय्या चाऊस यांच्या घरात उमेदवारी देवून चुरस निर्माण केली आहे. प्रकाश सोळंके यांच्यासमोर त्यांनी मोठे आवाहन उभे केले आहे. माजलगावकर भाजपाला किती साथ देतात हे निवडणुकीनंतर स्पष्ट होईल. मात्र या ठिकाणी मोहन जगतापच नगर पालिका ताब्यात घेतील असे एकंदरीत चित्र आहे. नगर पालिका निवडणुकीमध्ये गल्लीबोळातील राजकारण प्रभावी ठरते त्या दृष्टीने पंकजा मुंडे यांनी सर्वच नगर पालिकेमध्ये जुन्या आणि नव्या कार्यक्त्यांच्या फळीला कामाला लावले आहे.

# वार्ड क्र. १८ वर अशफाक इनामदार आणि सय्यद नदीम यांचीच 'हुकूमत'

### राजकीय 'चाणक्य' सय्यद मोईन मास्टर यांची 'मास्टरस्ट्रोक' भूमिका निर्णायक!

बीड , (दिव्य न्युज):- खासबाग प्रभाग क्रमांक १८ मध्ये निवडणुकीचा रणधुमाळा उसळला असताना राष्ट्रवादी पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी सभापती अशफाक इनामदार आणि युवा नेते सय्यद नदीम यांनी अक्षरशः धमाकेदार अशी लाट निर्माण केली आहे. अशफाक आणि नदीम यांच्या प्रचाराला मिळणारी प्रचंड गर्दी, त्यांच्या प्रत्येक भेटीत उसळणारा उत्साह आणि मतदारांचा ठाम विश्वास पाहता या प्रभागात अशफाक आणि नदीम प्रचंड मतांनी विजयी होणार अशी चर्चा सर्वत्र जोरात आहे. या परिसरामध्ये अशफाकसह नदिमच्या नावाचा बोलबाला असून, विजयासाठी स्वतः जनतेनेच पुढाकार घेतला असल्याचे चित्र येथे दिसत आहे.येत्या २ डिसेंबरच्या मतदानाच्या आधी संपूर्ण शहरात प्रचार वाढत असताना खासबाग प्रभाग १८ मध्ये मात्र एकतर्फी वातावरण तयार झाले आहे.अशफाक इनामदार आणि सय्यद नदीम यांच्या प्रचारयात्रा, गल्लोगल्ली भेटी आणि कोपरा सभांमध्ये प्रचंड जनसागर उमटत आहे.महिलांचा मोठा पाठिंबा,तरुणांची विजयी ऊर्जा,वयोवृद्धांचा आशीर्वाद अन सामाजिक संघटनांची साथसंगत हे चारही घटक एकाच वेळी उमेदवारामागे उभे राहिल्याचे दिसत आहे. या प्रभागाने वर्षानुवर्षे दडपून ठेवलेल्या समस्या अशफाक आणि नदीम यांनी उचलून धरल्या. रस्ते, पाणी, युवकांसाठी संधी, दिवसभर प्रशासनाशी झगडणाऱ्या सामान्य नागरिकांची कामे. ते सातत्याने करीत असतात. अशफाक इनामदार आणि सय्यद नदीम हे फक्त नावापुरते कार्यकर्ते नसून परिसरातील प्रत्येक कुटुंबाच्या संपर्कात राहून काम करणारे कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे.एखादा नागरिक अडकला तर तात्काळ मदतीसाठी धावणे, शासकीय-प्रशासकीय कामांपासून खाजगी अडचणींपर्यंत प्रत्येक समस्येकडे वैयक्तिक लक्ष देणे, रुग्णवाहिका, आरोग्य, पाणी-गटार, शाळा, शासकीय कल्याणकारी योजना यापैकी कोणत्याही प्रश्नाकडे दुर्लक्ष न करणे, यामुळे काम करणारे माणूस अशी प्रतिमा त्यांनी या भागात निर्माण केली आहे.



# यंदा प्रभाग १९ मध्ये अपक्ष उमेदवार रुपाली सतीश पवार यांची छत्री पवारफुल!



बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून आता अवघा एकच दिवस मतदानाला शिल्लक आहे. संपूर्ण शहरात राजकीय हालचाली वेगाने सुरू असताना प्रभाग क्रमांक १९ मध्ये वेगळेच वातावरण पाहायला मिळत आहे.

या प्रभागातून अपक्ष उमेदवार म्हणून रुपाली सतीश पवार या छत्री या चिन्हावर रिंगणात आहेत. नागरिकांमध्ये त्यांचा प्रचार जोरदार वेगाने सुरू असून स्थानिक मतदारांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

रुपाली पवार हे यापूर्वी नगरसेवक पदावर कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात लोकांशी नाळ जुळवून ठेवत त्यांनी कोणतेही सुख-दुःखाचे प्रसंगात जनतेची साथ सोडली नाही. त्या कामाचीच पावती या निवडणुकीत मतदार देत असल्याचे चित्र दिसत आहे.यंदाच्या निवडणुकीत विशेष म्हणजे पारंपरिक पक्षीय समीकरणांना छेद देत प्रभागातील नागरिकांनीच त्यांच्या प्रचाराची धुरा स्वतःच्या हाती घेतली आहे. घराघरांतून रुपाली पवार यांच्या समर्थनाचे सूर उमटत असून मतदानापूर्वीच त्यांच्या बाजूने वातावरण निर्मिती झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.प्रभाग क्रमांक १९ मधील मतदारांना त्यांच्या प्रामाणिक कार्यशैलीवर आणि घराण्याच्या लोकाभिमुख भूमिकेवर पूर्ण विश्वास असल्याचे दिसत आहे. त्यामुळे या प्रभागात रुपाली पवार यांचा विजय निश्चित असल्याचा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.बीड शहरात या वातावरणामुळे प्रभाग १९ वर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले असून मतदानाचा कौल कोणाकडे झुकतो याकडे आता सर्वांची उत्सुकता लागली आहे.

# तुतारी, मशाल ला मत म्हणजे प्रभाग क्रं.८ च्या विकासाला मत



बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील प्रभाग क्र.८ मधील अपूर्ण राहिलेले विकास कामे पुर्ण करण्यासाठी प्रभागातील मतदारांनी शरदचंद्र पवार आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या दोन्ही उमेदवारांना भरभरून मतदान करून विजय करण्याचा विळाच उचलला आहे. या प्रभागात काही ठिकाणी सिमेंट रस्ते, आणि पाईपलाईनचे काम बाकी असून प्रभात असून सोयीसुविधा मिळावे याकरीता शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले सय्यद अशफाक सय्यद मुहम्मद सिद्दीक (मुन्ना भाई) व तसेच शिवसेना उध्दव ठाकरे यांच्या पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले प्रा.सौ.मनिषा उल्हास गिराम यांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणुस आणि मशाल या चिन्हा समोरील बटन दाबवून त्यांना विजय करण्याचे ठरवले आहे. गेल्या चार पाच दिवसापासुन या दोन्ही उमेदवारांनी सर्व मतदारांची गाठी भेटी घेतली अनेकांनी आशिर्वाद ही दिले हे प्रभाग उच्च शिक्षित मतदारांचा असल्याने येथील मतदार कोणाच्या ही भुलथापाना बळी पडणार नाही प्रभागाच्या विकासासाठी बीडचे आमदार संदिप भैय्या क्षीरसागर, मा.आ.सय्यद सलिम यांचे हात मजबुत करून या दोन्ही उमेदवारांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणुस चा जोरदार आवाज निघत असून मतदारांनी विजयाची मशाल ही पेटवली आहे.

पान ४ वरून

## अजित पवार शब्दाच

आघाडीचे शेख निजाम, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक फारुक पटेल, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादीच्या युवती अध्यक्षा प्रिया डोईफोडे, रेखा फड, माजी नगराध्यक्ष मोईन मास्टर, दिलीप गोरे, झुंजार धांडे, सुहास पाटील, भागवत तावरे, पांडुरंग आवारे, सुनिल मगरे, गोरक्ष लोखंडे यांच्यासह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे तसेच सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना ना. अजितदादा पवार म्हणाले की, बीड शहरात अनेक प्रश्न रखडत पडलेले आहेत. रस्ते नाहीत, नाल्या नाहीत, रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब आहेत, मुला-मुलींना खेळण्यासाठी क्रीडांगण नाही, उद्यान नाही, आलेला निधी खर्च केलेला नाही, रस्त्याच्या बाजूला झाडे लावलेली नाहीत असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. विरोधकांनी ३५ वर्षे बीडची अवस्था बकाल करून टाकली, बारामती, पिंपरी चिंचवडचा विकास होवू शकतो मग बीडचा का नाही होवू शकत नाही ? असा प्रश्न उपस्थत करून तिकडे व्हिजन असणारे लोक आहेत आणि इकडे लोकांना वाऱ्यावर सोडून स्वतःचे घर भरणारे लोक असल्यामुळे आपली अवस्था अशी झालेली आहे. या भागातील खासदार झाले, आमदार झाले यांनी आत्तापर्यंत काय केले ? झोपा काढल्या का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ज्ञानराधा, साईराम, माँसाहेब आणि छत्रपती अशा पतसंस्थांच्या कुटे, परभणे, शिंदे आणि भंडारी या लोकांनी सामान्य लोकांचा पैसा लुटला. त्यातल्या तिघांना आम्ही जेलमध्ये पाठवले, एक फरार आहे. चुकीला माफी नाही, काम करत असताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतील तेंव्हा सुधारणा होतील आणि सुधारणा करण्यासाठी आपल्या विचाराची माणसं नगर परिषदेत पाठवावी लागतील. तुम्ही कचरा निर्माण करणाऱ्या माणसाला निवडून द्याल तर या बीडचा कचरा होईल स्वच्छता करणाऱ्या स्वच्छ विचाराच्या माझ्या माणसांना विजयी करा असे सांगून हावसे-नवसे-गवसे येतील, रात्रीतून गडबड करतील त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, येणाऱ्या २ तारखेला घडी आणि धनुष्यबाण या चिन्हासमोरचे बटन दाबून मला काम करण्याची संधी द्या असे कळकळीचे आवाहन ना. अजितदादा पवार यांनी केले. यावेळी बोलताना माजीमंत्री नवाब मलिक म्हणाले की, ही निवडणुक बीडचे भविष्य बदलणारी निवडणुक आहे, मनात किंतु-परंतु न ठेवता, प्रशासकीय अनुभव असणाऱ्या प्रेमलता पारवे यांच्यासह मित्रपक्षाचे सर्वच्या सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी करा. ना. अजितदादा पवार यांच्यासारखा विकास पुरुष आपल्या पाठिशी आहे, त्यांच्या माध्यमातून बीडची बारामती करा, सर्व धर्म समभाव विचार घेऊन आम्ही, सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करत आहोत, तेंव्हा आपल्या विचाराची माणसं सत्तेत पाठवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना डॉ.ज्यातीताई मेटे म्हणाल्या की, विरोधकाने नगर पालिकेचा वापर स्वार्थी राजकारण करण्यासाठी केला, अटल अमृत योजनेचा निधी कुठे गेला ? याचा जबाब तुम्ही त्यांना विचारला पाहिजे. विकासाचा ताळेबंद घेऊन चर्चा करा, बीड नगर परिषदेमध्ये परिवर्तन करण्याची संधी चालून आलेली आहे. त्यासाठी घड्याळ चिन्हासमोरचे बटन दाबून सर्व उमेदवारांना विजय करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी दिलीप गोरे व भागवत तावरे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच सतिष क्षीरसागर, गौतम मोरे, आरेफ खान, फेरोज खान यांनी ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला. ना. अजितदादा पवार यांच्या माजलगाव, धारुर येथील जाहिर सभा झाल्यानंतर त्यांनी बशीरगंज चौकात जाहिर सभेच्या ठिकाणी आगमन होताच लगेच भाषणाला सुरुवात केली. आपल्या भाषणात त्यांनी बीडमध्ये काय करायचे आहे याचा विकास आराखडाच मांडला. त्यांच्या या सभेला महिला, पुरुष मतदार व कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. सभास्थळी मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद आणि उत्साह राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाला आहे.

## प्रभाग क्र.१७

समाधान व्यक्त करत त्यांना आता नगरसेवक करण्याचा निश्चिय केला आहे.तळमळीने काम करणारे या सय्यद फरहान यांना नगरसेवक करण्याची हीच योगय वेळ आहे. चांगले आणि दर्जेदार काम करणारे या युवकाला मतदारांनी संधी देण्याचे ठरविले आहे येणाऱ्या २ तारखेला त्यांचा पंजा या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांचे हात मजबुत करून प्रभागाचे विकासाठी नगरपालिकेचे सभागृहात पाठविणार आहे.

पान १ वरून

## इलियास टेलर यांनी

टंचाई निर्माण होते पण या प्रभागात इलियास टेलर यांच्या नियोजनबध्द कामांमुळे कधीही पाण्याची टंचाई निर्माण झालेली नाही. प्रभागात नगरसेवक नसतांनाही मागील अनेक वर्षापासून त्यांचे काम सतत सुरू आहे. स्वच्छता असो की विद्युतचे कामे असोत ते जातीने लक्ष घालून हे कामे पूर्ण करून घेतात. काही दिवसांपुर्वी प्रभागातील लाईट डीपी नादुरूस्त झाली होती. या प्रभागातील स्वयंघोषीत भावी नगरसेवकांनी याकडे दुर्लक्ष केले. रात्रभर पुर्ण प्रभाग अंधारमय होता नंतर इलियास टेलर यांनी लक्ष घालून कार्यकारी अभियंता, महावितरण यांना दुरध्वनीवरून संपर्क साधून तात्काळ डीपी पुरवठा करण्याचे सांगितले. त्यानंतरच महावितरणचे विभाग जागे झाले आणि प्रभागात नवीन डीपी आणण्यात आली. अशा या उत्तम कामगिरी करणाऱ्या इलियास टेलर यांच्यामुळे त्यांच्या कन्येला नगरसेवक होण्याची संधी प्राप्त झाली असून येणाऱ्या २तारखेला त्यांचे निवडणूक चिन्हा हाताचा पंजा या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे प्रभागातील नागरीकांनी ठरविले आहे.

## प्रभाग क्रमांक १७ (ब)

प्रतिसाद उत्साहवर्धक असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

यंदाच्या निवडणुकीत विरोधकांकडूनही जोरदार तयारी सुरू असली तरी शेख शफिक यांच्या संघटित कार्यपद्धती आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क मोहिमेमुळे त्यांची बाजू अधिक मजबूत दिसते. विकासाच्या मुद्द्यांवर निवडणूक लढविण्याचा त्यांचा निर्धार लक्षवेधी ठरत आहे.

आता प्रभाग क्रमांक १७ (ब) मधील मतदारांचा अंतिम कौल कोणाच्या बाजूने जाणार याची उत्सुकता वाढली असली, तरी सध्याच्या परिस्थितीत रुकसाना बेगम शेख शफिक यांच्या 'हॅट्रिक'कडे होणारी वाटचाल अधिक स्पष्टपणे दिसू लागली आहे.

## शेतकरी कामगार पक्ष

न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहे या पक्षाचे बीड चे ज्येष्ठ नेते म्हणून शेख शफिक भाई यांना ओळले जाते त्यांचे लहान बंधु स्व.ॲड.शेख रफिक यांना जिल्हाच नव्हे संपूर्ण राज्यात ओळख होती ते या प्रभागाचे जुने नगरसेवक होते त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अत्यंत दर्जेदार विकास कामे या प्रभागात केले आहे. तसेच शेख शफिक हे ही दोन वेळ नगरसेवक राहीलेले आहे त्यांना ही नगरपालिकेचा दांडगा अभ्यास आहे अशा या अभियासु नेतृत्वाला प्रभागातील मतदारांनी साथ देणे गरजेचे आहे. शेतकरी कामगार पक्षाचे हे बीड जिल्हयातील बीड नगरपालिकेत एकमेव नगरसेवक पदाचे उमेदवार आहे.

## प्रभाग क्रमांक १७ (ब)

वाटचाल अधिक स्पष्टपणे दिसू लागली आहे.

शेतकरी कामगार पक्ष हे न्यायसाठी लडणारा पक्ष

शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास जुना आहे या पक्षाचे अनेक नेते मंडळीने इतिहास गाजविला आहे या पक्षाचे अनेक नेते आमदार खासदार झालेले आहे राज्याच्या मंत्रालयात या पक्षाच्या नेत्यानी गोरगरीब कष्टकरी, शेतकरी, सर्व जातीय जमातीला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहे या पक्षाचे बीड चे ज्येष्ठ नेते म्हणून शेख शफिक भाई यांना ओळले जाते त्यांचे लहान बंधु स्व.ॲड.शेख रफिक यांना जिल्हाच नव्हे संपूर्ण राज्यात ओळख होती ते या प्रभागाचे जुने नगरसेवक होते त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अत्यंत दर्जेदार विकास कामे या प्रभागात केले आहे. तसेच शेख शफिक हे ही दोन वेळ नगरसेवक राहीलेले आहे त्यांना ही नगरपालिकेचा दांडगा अभ्यास आहे अशा या अभियासु नेतृत्वाला प्रभागातील मतदारांनी साथ देणे गरजेचे आहे. शेतकरी कामगार पक्षाचे हे बीड जिल्हयातील बीड नगरपालिकेत एकमेव नगरसेवक पदाचे उमेदवार आहे.